
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# डॉ.रवींद्र शोभणे यांचे कथालेखन : स्वरुप आणि आस्वाद

प्रा.अनिलकुमार दडमल
मराठी विभाग प्रमुख, गुलाम नबी आझााद कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बार्शीटाकळी, जि.अकोला.

## प्रास्ताविक :



मराठी साहित्यात कथा हा साहित्य प्रकार अत्यंत लोकप्रिय ठरलेला आहे. १९८० नंतरच्या काळात अनेक लेखकांनी कथालेखन केलेले आहे. मानवी जीवनाचा पट कवेत घेऊ पाहणारा हा साहित्यप्रकार वाचकांच्या पसंतीसही उतरलेला आहे. एक मोठी पिढी या काळात दमदारपणे कथालेखन करताना दिसते. याच परंपरेतले एक समृध्द कथाकार म्हणून रवींद्र शोभणे यांचे नाव आवर्जून घेतले जाते. प्रस्तुत शोधनिबंधाच्या निमित्ताने शोभणे यांच्या कथालेखनाचे स्वरूप विचारात घेता येईल.

शोभणे यांनी आपल्या कथात्मक लेखनाची सुरुवातच कथालेखनांनी केलेली आहे. महाविद्यालयीन जीवनात लिहिलेल्या कथांनी त्यांच्या अभिव्यक्तीला नवे परिमाण निर्माण करण्याचे प्रयत्न महाविद्यालयीन स्तरावर झालेले होते. महाविद्यालयात शिकत असताना त्यांनी आपली पहिली कथा लिहिली ती म्हणजे भूक होय. या कथेपासून त्यांच्या कथालेखनाला प्रारंभ झाला व मराठी साहित्याच्या प्रांतात एक सशक्त कथा लेखक मिळाला. यांची ही कथा सामाजिक होऊन एकच एक विचार न मांडता आपल्या सभोवतालाला सोबत घेऊन साकार होताना दिसून येते. कथेच्या प्रांतात लक्षणीय लेखन करणारे शोभणे आपल्या वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण कथा लेखनामुळे वाचकांच्या पसंतीस उतरले आहेत. २०१३ पर्यंत त्यांचे जवळपास सात कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. वर्तमान १९९१, दाही दिशा १९९४, शहामृग १९९८, अदृष्टाच्या वाटा २००८, चंद्र उत्सव २०११ हे त्यांचे महत्त्वाचे कथासंग्रह आहेत. अनेक समीक्षकांनी या कथासंग्रहाचे भरभरून स्वागत केले आहे. १९९० नंतरच्या कालखंडात जागतिकीकरणाने मानवी समाजात जे स्थित्यंतरे घडून आली, त्या स्थित्यंतराचे परिणाम मानवी समाजावर कसे होत गेले ते शोभणे यांच्या कथातून प्रत्ययकारिकतेने अधोरेखित होताना दिसून येते. त्यांच्या कथा या माणसाच्या जीवनातील गुंतागुंत, बदलते नातेसंबंध, मानवी नात्यात वाढत जाणारी, बदलत्या वृत्ती—प्रवृत्ती, घराण्याशी निष्ठा, बदलते समाज वास्तव, मानवी मूल्यांचे होणारे अध:पतन, प्रत्येक क्षेत्रात निर्माण झालेली तीव्र स्पर्धा, जगण्यासाठी तडजोड तडजोड करण्याची प्रवृत्ती, वैयक्तिक तसेच सामुदायिक स्वार्थापोटी एकमेकांचे गळे कापण्याची वाढलेली स्पर्धा, आपल्या तत्त्वांना चिकटून राहणाऱ्या लोकांची होणारी मानहानी असे एक ना अनेक विषय अत्यंत परिणामकारकतेने शोभणे यांनी आपल्या कथालेखनातून मांडले आहेत. या कथा समकालीन प्रश्नांना भिडण्याचे काम करतात म्हणूनच त्या कथा वाचकांना आपल्या वाटायला लागतात. ग्रामीण समाजातून आलेले असल्यामुळे ग्रामीण माणसांच्या व त्यांच्या सभोवतालातील प्रश्नांचा अत्यंत परिणामकारकतेने वेध घेताना दिसून येतात. जागतिकीकरणाने ग्रामीण माणसांची झालेली वाताहत हा त्यांच्या लेखनाचा गाभा असल्याचे दिसून येते. परिस्थितीला शरण जाणारी माणसं आणि या माणसांच्या अंतर्बाह्य विश्वास साकार करणारी वैधव्यपूर्ण भाषा एका वेगळ्या विश्वात घेऊन जाते म्हणूनच डॉ.शोभणे

समकालीनात वेगळे दिसून येतात. समाजात अत्यंत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या स्त्री—पुरुष नातेसंबंधावर शोभणे नेमकेपणाने भाष्य करताना दिसून येतात. नातेसंबंधाच्या ताणतणाव बरोबरच स्त्री—पुरुषांच्या आयुष्यात निर्माण होणारे वेगवेगळे प्रश्न आणि त्यातून आयुष्याकडे बघण्याचा बदलत जाणारा दृष्टिकोन हे शोभणे यांच्या अनेक कथांचे विषय झालेले आहेत. ग्रामीण समाजात दुष्काळामुळे होणाऱ्या मानवी जगण्याच्या विवंचनेचा आविष्कार त्यांच्या कथेतून प्रभावीपणे झाल्याचे दिसून येते.

समाजकारण, राजकारण, बदलते सांस्कृतिक विश्व, शैक्षणिक विश्व आणि मानवी मूल्यांची होत जाणारी घसरण अशा संभ्रमाच्या काळात मानवी समाजाचे दु:ख आणि बरोबरीनेच मानवी समाजाला येत आलेले यांत्रिकीकरणाचे स्वरूप आपल्या कथेच्या केंद्रस्थानी ठेवून मानवी जगण्याचा एक परी साकार करण्याचे काम रवींद्र शोभणे यांच्या कथेने प्रभावीपणे केलेले आहे. त्यांच्या कथालेखनाचे वैविध्य आणि कथालेखनाची विशेषता अधोरेखित करताना त्यांच्या समकालीन कथा आणि त्यांनी हाताळलेले विषय वैविध्य व कथालेखनाच्या वेगवेगळ्या घटकात केलेले नवनवीन प्रयोग त्यांच्या कथेचे वेगळेपण अधोरेखित करणारे आहे.

वर्तमान हा त्यांचा कथासंग्रह वाढत्या औद्योगिकरणामुळे माणसामाणसात निर्माण होत गेलेला दुरावा, माणसाची वाढत गेलेली स्वार्थांध प्रवृत्ती तसेच मानवी समाजात दोन पिढ्यांमध्ये वाढत गेलेलं अंतर व त्यातून निर्माण झालेल्या समस्या हे या कथातून परिणामकारकतेने साकार झालेले आहे. या प्रत्येक कथेतील पात्र वेगवेगळ्या वृत्ती—प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करणारी तसेच वेगवेगळ्या समस्या केंद्रीभूत करणारी आहेत. अनेक प्रश्न घेऊन उभ्या राहिलेल्या व्यक्तिरेखा समकालीन वास्तवाचे अनेक पदर आपल्यासमोर उलगडून दाखवितात. त्यातील पायरीचा दगड, न सापडलेले उत्तर, हकनाक, आपुले मरण, जल्लोष आणि तेथे लव्हाळे राहतो अशा एकूण आठ कथा प्रसिद्ध झालेल्या आहेत. या प्रत्येक कथेतून वर्तमान समाजव्यवस्थेच्या बदलत जाणाऱ्या चेहऱ्याचे प्रातिनिधिक चित्र आणि मानवी मनाची झालेली गुंतागुंत याचे मर्मस्पर्शी चित्रण झालेले आहे. दाही दिशा या त्यांच्या कथासंग्रहातील प्रत्येक कथा एक स्वतंत्र वैशिष्ट्य घेऊन साकार होते. मानवी समाजातील नात्यांची गुंतागुंत त्याचबरोबर बदलत जाणारी मानवी मनोवृत्ती आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न याला अधोरेखित करताना रवींद्र शोभणे स्त्रीच्या अंतर्बाह्य मनाची होणारी घुसमट आणि कुटुंब व्यवस्थेत खेडेगावात घडणारी स्त्रीच्या आयुष्याची वाताहत, त्याचबरोबर मुलीच्या लग्नाची चिंता बाळगणारा बाप आणि त्यातून त्याच्या आयुष्याची होणारी शोकांतिका अशा वेगवेगळ्या प्रश्नांच्या भोवती फिरणारी कथा आपल्याला अंतर्मुख करुन सोडते. धर्म ही कथा हलकीफुलकी पण त्याच वेळी गंभीरपणे विचार करायला लावणारी महत्त्वाची आहे. गावातल्या हनुमान मंडळाने बांधलेल्या चौथऱ्यावर हनुमानाची मूर्ती बसवायच्या आतच महादेव मंडळ शंकराच्या पिंडीची स्थापना करते आणि त्यातून जो प्रसंग होतो त्याचे वास्तव दर्शन या कथेत पहावयास मिळते. मानवी समाजात किती बदल झाला तरी धर्म ही गोष्ट मानवी मनातून कशी नाहीशी होत नाही याचे दर्शन या कथासंग्रहातून पाहावयास मिळते. मनाला चटका लावणारी, त्याचबरोबर विचारप्रवृत्त करणारी तसेच वास्तवाचे दर्शन घडविणारी कथा ही कथासंग्रहातील कथांची प्रधान वैशिष्ट्यच म्हणावी लागतील.

शहामृग हा रवींद्र शोभणे यांचा कथसंग्रह एका वेगळ्या धाटणीचा आणि महत्त्वपूर्ण कथासंग्रह आहे. एखादे कथाबीज नेमकेपणाने हेरणे, फुलविणे, त्यातील मर्म हेरत अंताकडे नेतांना या कथासंग्रहात असल्याचे दिसून येते. समाजातील माणसांच्या वृत्ती—प्रवृत्ती अधोरेखित करत असताना माणसांच्या अंतरंगातील वेगवेगळे भाव देण्याचे कार्य या कथेतील व्यक्तिरेखांच्या माध्यमातून शोभणे यांनी केले आहे. शहामृग सारखी कथा सामाजिक आणि सुधारणावादी दृष्टिकोन सांभाळणाऱ्या आनंदरावांच्या अंतर्बाह्य विश्वाची होत जाणारी घालमेल अधोरेखित करणारी महत्त्वपूर्ण कथा आहे, तर केसाळ कातडी या कथेतही आपल्याच मनाचे उत्खनन करताना दिसते. अशा स्त्रीच्या अस्तित्वाचा प्रश्न कशा पद्धतीने निर्माण झालेला आहे, हे सांगण्याचे काम करते आहे. खेळिया या कथेतून राजकारणातील सत्तापिपासू प्रवृत्तीचे चित्रण शोभणे यांनी अत्यंत नेमकेपणाने अधोरेखित केले आहे. या कथासंग्रहातील कथांकडे पहात असताना असे वाटते की, या कथा व्यक्तिकेंद्री आहेत. परंतु, या कथा व्यक्तीच्या भावविश्वाला साकारताना समाजातील राजकारण, अर्थकारण आणि आंतरिक वास्तवातील सुप्त गुणांची बेरीज आणि वजाबाकी.नेमकेपणाने

मांडणाऱ्या महत्त्वपूर्ण कथा आहेत. अशा दर्जेदार कथा लेखन करणारे शोभणे म्हणूनच या काळात वाचकप्रिय प्रिय कथाकार ठरतात.

तद्‌भव हा शोभणे यांचा कथासंग्रह आजचा संवेदनशील लेखक वैचारिक बांधिलकी पेक्षा एका जिज्ञासू क्रियाशील निरीक्षकाच्या भूमिकेतून सामाजिक गुंत्याचा आपल्या परीने अर्थ लावण्याचा प्रयत्न कसा करतो, याचे दर्शन घडविणारा महत्त्वाचा कथासंग्रह आहे. या कथासंग्रहातून समकालीन वास्तवाचे व बदलत्या सांस्कृतिक परिघाचे भेदक चित्रण करताना रवींद्र शोभणे आपल्या समकालीन वास्तवाची जाणीव करून देताना दिसून येतात. या संग्रहातल्या तद्‌भव आणि या कथा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. हिंदू—मुस्लीम असे धर्म आपण मानतो पण तसे नसते. मानवी समाज या धर्माच्या पलीकडे जाऊन माणूस पणात कशापद्धतीने साकार होत असतो, हे दाखविण्याचे कार्य या कथेच्या माध्यमातून करतात. माणुसकीच्या नात्याने कशा पद्धतीने आपले जीवन जगतो हे या कथेतून प्रभावीपणे साकार होते. या कथेत आलेली प्रत्येक व्यक्तिरेखा बदलत्या सामाजिक वास्तवात तावून आणि सुलाखून कशा पद्धतीने सिद्ध करू पाहते आहे हे लक्षात येते. तद्‌भव या कथासंग्रहातील ही कथा महत्त्वाची आहे. हे दोन पत्रकार महापुरात मोवाड वाहून गेल्याची बातमी आणि त्या संदर्भातले हे दोघेही तिथे जातात. आणि फोटो घेत नाहीत, त्या लोकांच्या भूक मरण्याच्या प्रकारापेक्षा नंदूला स्वत:चे काव्यात्मक फोटोग्राफीचे प्रदर्शन भरवण्यासाठी लागणाऱ्या फोटोचे आकर्षण असते. अशी त्याची बदलती मनोवस्था आणि स्वातंत्र्यवादी विचारसरणीत स्त्रीच्या अस्तित्वाभोवती निर्माण झालेले अनेक प्रश्न घेऊन ही कथा विचार प्रवृत्त करून सोडते. आजच्या युवा पिढीची प्रतिनिधी असणारी बेला आणि त्याच्या अनुषंगाने घडणारी ही कथा म्हणूनच महत्त्वपूर्ण वाटते. ही कथा संवेदनक्षम आहे. बदलत्या जीवनाचे वासनांचे तरुण—तरुणीच्या वागण्यात कसे प्रतिबिंबित झाले आहेत ते या कथेच्या माध्यमातून प्रकर्षाने जाणवत राहते. या कथेच्या अभिव्यक्तीला खऱ्या अर्थाने एक वेगळी उंची प्राप्त करून देणारा आणि महत्त्वाचा आहे. यापुढे आलेला चंद्रोत्सव हा त्यांचा कथासंग्रह नागपूर आणि परिसरातील जीवन वास्तवाचे नेमके दर्शन घडविणारा महत्त्वपूर्ण कथासंग्रह आहे. या सगळ्या कथांमध्ये सामाजिक जाणीव, मानसोपचार आणि मुलीचं नातं, मुलीला आई विषयी वाटणार एकटेपण अशा वेगवेगळ्या अंगांनी या कथा विकसित होत जातात. आंतरजातीय प्रेमविवाह हा विषय या कथेतून प्रामुख्याने आलेला आहे. शोभणे यांची कथा तरुण मुलामुलींची जशी आहे तशीच ती वृद्ध आणि वयस्कर माणसांचेही भावविश्व अधोरेखित करणारी कथा आहे. याच कथासंग्रहातील पार्थिवाचं वारूळ ही कथा देखील वाचकांची उत्सुकता वाढविणारी अत्यंत महत्त्वपूर्ण कथा आहे. मानवी नातेसंबंधातील गुंतागुंतीचे भावस्पर्शी चित्रण या कथेतून आलेले आहे, तर विश्रब्ध ही कथा घटस्फोटित पित्याची कन्या अमृता या दोघांच्या कथेमधून साकार झालेली महत्त्वपूर्ण कथा आहे. नवनवे विचार मानवी जीवनात कसे येऊ पाहत होते आणि त्यातून मानवी जगण्याला एक नवा संदर्भ कसा प्राप्त होत होता हे या कथेतून पाहावयास मिळते, तर कलथून खांब गेला या कथेमधील मुख्य पात्र विसुभाऊ अन विभावरी ही दोन पात्र आणि बदलते नातेसंबंध व बदलते जीवन संदर्भ यातून साकार होत जाते. नव्या संकल्पना आत्मसात करणारी ही नवी पिढी कोणत्या विचारधारेवर उभी राहते आहे हे दाखविण्याचे काम या कथेच्या माध्यमातून शोभणे यांनी केले आहे. माणसाचे जगणे हे सुख—समाधानाच्या शोधात असते. प्रत्येकाचे समाधान कशात आहे. मानवी संवेदना, अंतर्मन, अभिव्यक्ती आपण सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. माणसाचे मन आणि भावनांचा सखोल विचार या कथासंग्रहात शोभणे यांनी प्रभावीपणे केलेला आहे.

## समारोप :

सारांश रुपाने असे सांगता येते की, बदलत्या सामाजिक जीवन वास्तवाला कवेत घेऊन समकालासी संवाद साधण्याचे काम रविंद्र शोभणे यांच्या कथालेखनाने केलेले आहे. जसा काळ बदलत गेला, तशी माणसे बदलत गेली या बदलाचे हुबेहुब प्रतिबिंब शोभणे यांच्या कथालेखनात उमटलेले आहे. म्हणूनच आजच्या कथालेखनात रविंद्र शोभणे हे कथालेखक विविधता जोपासणारा एक महत्त्वपूर्ण लेखक ठरतात.

संदर्भ :

१. वर्तमान, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९१.
२. दाही दिशा, विजय प्रकाशन, नागपूर, द्वि.आ.१९९४.
३. शहामृग, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९८.
४. तद्भव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वि.आ.२००४.
५. अदृष्टाच्या वाटा, विजय प्रकाशन, नागपूर, २००८.
६. लघुकथालेखन : तंत्र आणि मंत्र, द्वि.आ. १९६८.
७. मराठी कथेची स्थितीगती, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९५.
८. त्रिमिती, डॉ.रविंद्र शोभणे, विजय प्रकाशन, नागपूर, २०१३.